॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळा अंतर्गत असलेल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने उद्या गुरूवार दि. २४ ऑगस्ट रोजी "बोलीतील कवितांचे सादरीकरण" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीच्या दृक-श्राव्य सभागृहात दुपारी २:३० वाजता होणा-या या कार्यक्रमात धुळे येथील डॉ. सदाशिव सुर्यवंशी आणि अमळनेर येथील शरद धनगर हे दोन कवी बोलीतील कवितांचे सादरीकरण करतील. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी राहणार आहेत.

### बातमी क्रमांक २

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्यावतीने संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी आयटी क्षेत्रातील करिअरच्या संधी या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

गुगल कंपनीच्या पायाभूत सुविधा व आधुनिकरण विभागाचे तज्ज्ञ राकेश वराडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत १११ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अध्यक्षस्थानी समन्वयक डॉ. संदीप भामरे होते. प्रास्ताविक प्रा. राम भावसार यांनी केले. कार्यशाळेचे व्यवस्थापन प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी केले.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २३ ऑगस्ट , २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी